# भारत सरकार
# संरक्षण मंत्रालय
# माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजना

स्टेशन एचक्यू (ईसीएचएस सेल) आयएनएस गोमंतक
फोन : ०८३२-२५८२७५१/२५००७२२, ९९०६६३२८०३
ई-मेल: stnhqgomantak@gmail.com

## नोकरी सूचना

१. ईसीएचएस पॉलिक्लिनिक, वास्को येथे एक वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राटी तत्त्वावर, **उमेदवाराच्या कामगिरीच्या अधीन राहून/इतर अटींनुसार नूतनीकरण करण्यायोग्य एक वर्षाच्या अतिरिक्त कालावधीकरिता/वयाच्या अधिकतम मर्यादेपर्यंत,** प्रत्येक पदासमोर घालून देण्यात आलेल्या निकषानुसार खालील पॅरा वैद्यकीय स्टाफ आणि गैर वैद्यकीय स्टाफ म्हणून कार्यरत राहण्यासाठी ईसीएचएस अर्ज मागवत आहे.

| नेमणूक | किमान अर्हता | पदसंख्या | निश्चित वेतन |
|---|---|---|---|
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ (लॅब टेक्निशियन) | (i) बी.एस्सी. (मेडिकल लॅब टेक्नोलॉजी) किंवा (i) मान्यताप्राप्त संस्था/ मंडळाकडून विज्ञान विषयासह मॅट्रिक/उच्च माध्यमिक/वरिष्ठ माध्यमिक (१०+२) उत्तीर्ण. (ii) एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेकडून मेडिकल लॅब टेक्नोलॉजीमधील पदविका. किमान ३ वर्षांचा अनुभव. ईएसएमसाठी आरक्षण - ७०% | १ (एक) | २८,१००/- |
| वाहन चालक (ड्रायव्हर) | ८ वी इयत्ता उत्तीर्ण, वर्ग I एमटी वाहन चालक (सशस्त्र दल), यासाठी नागरी वाहन चालक परवाना असावा. वाहन चालक म्हणून किमान ५ वर्षांचा अनुभव असावा. ईएसएमसाठी आरक्षण - ७०% | १ (एक) | १९,७००/- |
| लिपिक (क्लार्क) | पदवीधर/वर्ग I क्लेरिकल ट्रेड (सशस्त्र दल), ०५ वर्षांचा अनुभव, संगणक पात्रता ईएसएमसाठी आरक्षण - ७०% | १ (एक) | १६,८००/- |

२. **नियम व अटी, अर्ज आणि वेतन यासाठी** कृपया आमचे www.echs.gov.in हे संकेतस्थळ पाहावे. अधिक माहितीसाठी कृपया स्टेशन एचक्यू, (ईसीएचएस कक्ष) आयएनएस गोमंतक, वास्को येथील दूरध्वनी क्रमांक ०८३२-२५००७२२/२५८२७५१, ९९०६६३२८०३ यावर आणि ई-मेल आयडी: stnhqgomantak@gmail.com येथे संपर्क करावा. तसेच तपशिलासाठी संबंधित ईसीएचएस पॉलिक्लिनिक यांना भेट द्यावी. माजी सैनिकांना प्राधान्य देण्यात येईल.

३. **आमच्या संकेतस्थळावर दिलेल्या नमुन्यानुसार अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख :** सुचविण्यात आलेल्या विहित नमुन्यातील अर्ज तसेच शैक्षणिक पात्रता आणि कामाचा अनुभव यांच्या समर्थनार्थ सर्व प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींच्या दुग्गल नकला ह्या ओआयसी, स्टेशन एचक्यू, (ईसीएचएस कक्ष) आयएनएस गोमंतक यांच्याकडे **दिनांक १२ जानेवारी २४** रोजी **१५०० तासांपर्यंत** सादर कराव्यात. **दिनांक १२ जानेवारी २४** रोजी **१५०० तासांनंतर** प्राप्त झालेला कोणताही अर्ज स्वीकारला जाणार नाही.

४. **मुलाखतीची तारीख, वेळ आणि ठिकाण :** लघुसूचित करण्यात आलेल्या उमेदवारांना टेलिफोनच्या माध्यमातून/ई-मेल/एसएमएसच्या माध्यमातून कळविण्यात येईल. उमेदवारांनी १०वी/मॅट्रिक, १०+२ आणि पदवी/पदव्युत्तर पदवी/पदविका/कोर्स, कामाचा अनुभव आणि डिस्चार्ज बुक, पीपीओ, सर्व्हिस रेकॉर्ड्स या सर्वांची मूळ प्रमाणपत्रे/गुणपत्रिका/डिग्री आणि पासपोर्ट आकारातील रंगीत छायाचित्र हे मुलाखतीला येताना घेऊन यायचे आहे. टीए/डीए लागू नाही. फक्त दर्जात्मक अर्हता साध्य करू शकणारे उमेदवारच अर्ज करू शकतात.